**प्रशासकिय ईमारत जिल्हा परिषद, वाशिम**
आयएसओ ९००१:२००८ मानांकित कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय समोर वाशिम ४४४ ५०५

दुरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२८१
ईमेल आयडी :- dyceozpwashim@gmail.com

वित्त विभाग ०७२५२२३२८७४
cafowashim@rediffmail.com

जाक्र/जिपवा/वित्त/ २०५ /२०१९ दिनांकः- ९ /१ /२०१९

## परिपत्रक

**विषय :-** स्थानिक निधी लेखा मा. पंचायत राज समिती व मा. महालेखाकार यांचे प्रलंबित परिच्छेद निकाली काढण्याबाबत.

**संदर्भ :-** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ४६.

उपरोक्त विषयास अनुसरुन जिल्हा परिषद व पंचायत समिती कडील प्रलंबील परिच्छेद निकाली काढणे बाबत वित्त विभाग जिल्हा परिषद वाशिम यांचे कडुन वारंवार पत्रव्यवहार व आढावा सभा घेउन सुध्दा परिच्छेद निकाली काढण्याची गती संथ असल्याने प्रलंबीत लेखा आक्षेपाची संख्या फार मोठया प्रमाणात दिसुन येते. सदर विषय यशवंत राज पंचायत अभियानामध्ये तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दैनंदीनीशी निगडीत असल्याने व त्यावर जिल्हा परिषद वाशिम यांचे गुणानुक्रमांक अवलंबुन असल्याने सदरचा विषय हा अत्यंत महत्वाचा आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ४६ नुसार परिषदेकडे यथास्थिती पंचायत समितीकडे असलेले सर्व लेखा आक्षेप त्वरीत व शिघ्रतेने निकाली काढण्याची जबाबदारी विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांची आहे. लेखा आक्षेपांचे अनुपालन वेळीच सादर करुन आक्षेप वगळुन घेण्याबाबतची लेखी कार्यवाही आवश्यक असतांना अशी कार्यवाही होत नसल्याचे दिसुन येते. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विभाग स्तरावर नोडल अधिकारी व सहायक लेखा अधिकारी यांना पंचायत समिती स्तरावर नोडल अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे.

लेखा आक्षेप निकाली काढण्याचे काम हे वित्त विभागाचेच आहे व वित्त विभागाच्या कर्मचा-यांनी / लेखा संवर्गातील कर्मचा-यांनीच सदरचे काम करावे अशी धारणा कार्यालयीन अधिक्षक व कक्ष अधिकारी यांची झालेली असल्याने परिणाम स्वरुप लेखा आक्षेपांचे निर्गतीकरण करण्याचे काम संथ गतीने होत आहे, यास्तव खाते प्रमुख व पंचायत समिती स्तरावर ज्या कार्यालयामध्ये सहायक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी यापैकी जे पद मंजुर असेल अशा पदावरील कर्मचा-यांवर लेखा आक्षेप निपटारा करण्याची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. जेनेकरुन वित्त विभागाच्या मदतीने लेखा आक्षेप जलद गतीने करणे शक्य होईल.

सबब आपणास याव्दारे निर्देशित करण्यात येते की, लेखा आक्षेपांचे निर्गतीकरण जलद गतीने होण्यासाठी आपण व्यक्तीशः लक्ष देवून आपले स्तरावर सबंधीत सहायक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचे वर जबाबदारी निश्चित करण्यात येवून जास्तीत जास्त प्रलंबीत परिच्छेद कसे निकाली निघतील या करीता सहायक लेखा अधिकारी यांच्या मदतीने निपटारा करणे बाबतची दक्षता घ्यावी व तसा अहवाल सादर करावा.

**प्रती,**

१) खाते प्रमुख ---------------------------------------------------------------- (सर्व) जि.प. वाशिम.
२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती ------------------------------------------ (सर्व) जि.प. वाशिम.

९/०१/१९

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**

**प्रत,**

१) मा. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांना माहितीस्तव.
२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

Scanned by CamScanner